NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

**(Formerly Solapur University)**

Pune-Solapur Highway, Kegaon, Solapur - 413 255,
Phone:0217-2744770,71,72,73,74, 2351300
Website:http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in



## Health Centre / आरोग्य केंद्र

दि.१५/०९/२०२०

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

### ऑक्टोबर २०२० अंतिम सत्र परीक्षेसाठी मार्गदर्शक तत्वे व सूचना

कोव्हीड १९ या आजाराच्या पार्श्वभूमीवर मा.सर्वोच्च न्यायालय तसेच विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विज्ञापीठ हे अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या सर्व विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षा ऑनलाईन तसेच ऑफलाईन स्वरुपात घेणार आहे. परीक्षा घेताना विद्यार्थ्यांच्या व त्याचसोबत परीक्षेच्या कार्यात सहभागी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेस सर्वोच प्राधान्य देणे हे विद्यापीठाचे कर्तव्य आहे. यासाठी सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेताना घ्यावयाची काळजी व इतर गोष्टी यांसाठी सदरच्या मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या आहेत. सदरच्या मार्गदर्शक सूचना या केंद्रीय आरोग्य मंत्रालय यांनी दिलेल्या निर्देशानुसार असून सदरच्या सर्व सूचनांचे कटाक्षाने पालन करणे हे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, शैक्षणिक संकुले तसेच विविध अधिविभाग यांमधील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांना बंधनकारक आहे. सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, विविध संकुलाचे संचालक व  सर्व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदर सूचना काटेकोरपणे अमलात आणाव्यात.

**सर्व साधारण सूचना:**

1. महाविद्यालय परिसर अथवा प्रत्यक्ष परीक्षा हॉल मध्ये सर्वांनी एकमेकांपासून किमान ६ फुटाचे अंतर (फिजिकल डिस्टन्स) ठेवणे आवश्यक आहे.
2. महाविद्यालय परिसरामध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने मास्क परिधान करणे आवश्यक आहे. विना मास्क कोणत्याही व्यक्तीस महाविद्यालय परिसरात प्रवेश देऊ नये. या साठी प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक अथवा जबाबदार व्यक्तीस योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.
3. महाविद्यालय परिसरात प्रवेश करते वेळी प्रवेशद्वारावर इन्फ्रारेड थर्मल स्कॅनर मशीनने येणाऱ्या  प्रत्येक व्यक्तीचे तापमान पहावे व व्यक्तीचे नाव संपर्क क्रमांक व त्याचे तपामान यांची नोंद गेट वरील रजिस्टर मध्ये करून ठेवावी. ज्या व्यक्तीचे तापमान ९९° फेरेनहाईट / ३७.२° सेल्सिअस पेक्षा जास्त असेल त्यांना महाविद्यालय परिसरात प्रवेश देऊ नये.

4. महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या हातावर सनिटायझर द्यावे अथवा हात धुण्यासाठी साबण व पाण्याची पुरेशी सोय उपलब्ध करून द्यावी. हात न धुता कोणालाही आत प्रवेश देऊ नये.
5. महाविद्यालय परिसरामध्ये प्रवेश करणाऱ्या त्याच प्रमाणे महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या सर्व व्यक्तींनी खोकताना अथवा शिंकताना, नाक शिंकरताना स्वतःच्या रुमालाचा अथवा टिश्यू पेपर चा किंवा हाताच्या कोपराचा वापर करावा.
6. कोणत्याही प्रकारे महाविद्यालय परिसरात तंबाखू, गुटखा अथवा खैनी यांसारख्या पदार्थांच्या सेवनास बंदी असावी व कोणीही परिसरात अथवा इतरत्र थुंकणार नाही याची दक्षता घ्यावी.
7. महाविद्यालयात कार्यरत सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपापल्या मोबाईल फोन मध्ये 'आरोग्य सेतू' एप डाऊनलोड करून घ्यावे व वेळोवेळी त्याच्या वापर करत दक्ष राहावे. सदर एप पुढील लिंक वर जाऊन डाऊनलोड करता येईल.
   https://play.google.com/store/apps/details?id=nic.goi.aarogyasetu&hl=en_IN
8. को-मोर्बिड म्हणजेच ज्या व्यक्तींना उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार अथवा श्वसनविकारांची वैद्यकीय हिस्टरी आहे अशा व्यक्तींना शक्यतो गर्दीच्या ठिकाणातील परीक्षेच्या संदर्भातील कामे देऊ नये. अशा व्यक्तींना इतर ऑफिसकाम देता येऊ शकेल. अशा व्यक्तींनी गर्दीच्या ठिकाणी जाणे तसेच गर्दीच्या संपर्कात येणे टाळावे.

**परीक्षेच्या वेळी घ्यावयाची काळजी व दक्षता**

**प्रवेशद्वारावर घ्यायची दक्षता व काळजी**

1. ऑफलाईन मोड मध्ये परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या व परीक्षा केंद्रात येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची थर्मल स्कॅनिंग करून ताप नसल्याची खात्री करून मगच परीक्षा वर्गात प्रवेश द्यावा. परीक्षा हॉल मध्ये प्रवेश देते वेळी सर्व विद्यार्थ्यांना हातावर सनिटायझर द्यावे. विनामास्क व विना स्कॅनिंग करता कोणत्याही विद्यार्थ्यास प्रवेश देऊ नये.
2. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रवेश करते वेळी केवळ ओळखपत्र, हॉल तिकीट व पाण्याची बाटली इतकेच साहित्य सोबत आणावे. परीक्षार्थींची ओळख पटवताना पर्यवेक्षकांनी शक्य तवढे शारीरिक अंतर राहून व हातांचा वापर न करत परीक्षार्थींचे हॉलतिकीट किंवा ओळखपत्र पाहून त्यांना प्रवेश द्यावा.
3. सर्दी, ताप, खोकला अथवा दम लागणे यातील कोणतेही लक्षण असलेल्या विद्यार्थ्यास अथवा कर्मचाऱ्यास महाविद्यालयात प्रवेश देऊ नये. परीक्षेस येणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यास अशा स्वरुपाची लक्षणे आढळली तर ताबडतोब त्याला नजीकच्या शासकीय रुग्णालय अथवा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पाठवून द्यावे. अशा विद्यार्थ्यांची माहिती, संपर्क क्र. ताबडतोब विद्यापीठास कळवावी जेणेकरून अशा विद्यार्थ्यांची नंतरच्या काळात पुनर्परीक्षा घेण्याचे नियोजन विद्यापिठास करता येईल.
4. एखाद्या विद्यार्थ्यास अथवा कर्मचाऱ्यास उपरोक्त नमूद कोणतीही लक्षणे आढळल्यास त्याला वैद्यकीय मदत मिळेपर्यंत त्यास एका वेगळ्या खोलीत बसवावे. त्यासाठी महाविद्यालयात एका विशिष्ट खोलीची निवड करावी. हि खोली मुख्य परीक्षा हॉल पासून शक्यतो दूर असावी.

**परीक्षा हॉल मध्ये घ्यावयाची दक्षता व काळजी**

1. सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी तसेच पर्यवेक्षक यांनी मास्क वापरणे बंधनकारक राहील. हा मास्क सतत नाक व तोंडावर राहील याची दक्षता घेण्यात यावी. बोलण्यासाठी अथवा इतर कोणत्याही कारणासाठी मास्क नाकावरून खाली घेऊ नये. वापरलेला मास्क कोणत्याही परिस्थितीत खाली किंवा इतरत्र टाकू नये. आवश्यकता असल्यास असे वापरलेले मास्क व हात मोजे  वापरलेले मास्क अथवा रबरी हात मोजे हे नॉनटच फुट ऑपरेटेड डस्टबिन मध्ये टाकावेत. असे मास्क व हात मोजे हे जैव वैदयकीय कचरा असल्याने त्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक असते. अशा परिस्थिती मध्ये असा जैव वैद्यकीय कचरा जमा करण्यासाठी नॉनटच फुट ऑपरेटेड डस्टबिन्सची सोय करून आपापल्या ठिकाणी असलेल्या जैव वैद्यकीय विल्हेवाट कंपनीस संपर्क करून त्यांच्या कडे सदर कचरा सुपूर्द करावा.
2. परीक्षा चालू झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव (वैद्यकीय इमर्जन्सी वगळता) परीक्षार्थींना परीक्षा हॉल बाहेर सोडू नये.
3. पर्यवेक्षक यांनी शक्य असल्यास रबरी हातमोजे वापरावेत किंवा स्वतःसोबत सनिटायझर बाळगावे व वेळोवेळी हात निर्जंतुक करावेत. प्रश्नपत्रिकेचे पाकीट फोडताना तसेच उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना देताना कोणत्याही परिस्थिती हाताच्या बोटास थुंकी लावू नये. त्याच प्रमाणे उत्तरपत्रिका गोळा करून त्याच ठिकाणी पाकिटात सीलबंद करून विद्यापीठाकडे जमा कराव्यात.
4. परीक्षा हॉल हा परीक्षा चालू होण्याआधी व झाल्या नंतर सोडियम हायपोक्लोराईड (१ लिटर पाण्यासाठी १० मिली सोडियम हायपोक्लोराईड)  च्या द्रावणाने निर्जंतुक करून घ्यावा. त्याच सोबत सर्व बेंचेस, दारांच्या कड्या, टेबल्स यांचे  देखील सतत निर्जंतुकीकरण करावे.
5. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी व्हील चेअर व इतर आवश्यक त्या सोयी महाविद्यालयाने उपलब्ध करून द्याव्यात.
6. पिण्याच्या पाण्यासाठी मुबलक प्रमाणात सोय करून ठेवावी. पाणी देण्यासाठी त्याच प्रमाणे चहापान करण्यासाठी काचेचे ग्लास किंवा कपबशी न वापरता जास्तीजास्त प्रमाणात डिस्पोजेबल कप्स चा वापर करावा.
7. परीक्षा हॉल मध्ये दोन परीक्षार्थी मध्ये किमान ६ फुट अंतर असेल या पद्धतीने बैठक व्यवस्था करण्यात यावी.
8. परीक्षा हॉल मध्ये हवा खेळती राहील याची विशेष दक्षता घ्यावी. यासाठी सर्व खिडक्या उघड्या ठेवणे त्याच प्रमाणे पंखे चालू ठेवणे इत्यादी बाबींकडे विशेष लक्ष द्यावे.
9. प्रत्येक विद्यार्थ्यास उत्तर पत्रिका देण्या आधी व परीक्षा संपल्यानंतर उत्तर पत्रिका गोळा करताना पर्यवेक्षकाने वारंवार आपले हात निर्जंतुक करावेत. तसेच हाताचा नाकास व तोंड यास स्पर्श होणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठी फेस शिल्डचा वापर करणे योग्य राहील.

**इतर दक्षता**

1. सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी आपापल्या क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा नागरी आरोग्य केंद्र अथवा ग्रामीण रुग्णालय येथील प्रमुख यांना परीक्षेच्या संबंधी पूर्व कल्पना देऊन त्यांचे संपर्क क्रमांक माहिती करून घ्यावेत जेणेकरून तातडीच्या वेळी त्यांना संपर्क करणे सोयीचे जाईल.
2. परीक्षा काळात तसेच इतर वेळी देखील कोव्हीड आजारापासून सर्वांचा बचाव करण्यासाठी सदर माहिती आपल्या अधिनस्त सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना परिपत्रक काढून अथवा व्हाटसएप समूहाच्या माध्यमातून पोचवावी.
3. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने परीक्षांसाठी Standard Operating Procedures (SOPs) निर्गमित केलेल्या असून त्या खालील लिंक वर उपलब्ध असून सर्व प्राचार्यांनी त्या अभ्यासाव्यात.
   https://www.mohfw.gov.in/pdf/RevisedSOPonpreventivemeasurestobefollowedwhileconductingexaminationstocontainspreadofCOVID19.pdf

(आपल्याला वरील मार्गदर्शक सुचनांसंदर्भात कोणतीही अडचण असेल अथवा मार्गदर्शन हवे असेल तर आपण विद्यापीठ वैद्यकीय अधिकारी डॉ.अभिजित जगताप यांना त्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांक ९७३०१०५९६१ वर संपर्क करू शकता अथवा आपल्या शंका ahjagtap@sus.ac.in या ई मेल वर पाठवून त्याचे निरसन करून घेऊ शकता असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.)